Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development



***A Multidisciplinary International Level Referred Journal***

***March-2022 Volume-13 Issue-16***



**Chief Editor**
*Dr. R. V. Bhole*
**Editor**
*Dr. C. V. Murumkar*
**Co-Editor**
*Dr. S.K. Patil*
*Mr. K.V. Kulkarni*






**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

CamScanner

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, March 2022, Volume-13, Issue-16

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*March 2022 Volume-13 Issue-16*

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Editor**
**Dr. C. V. Murumkar**

**Co-Editor**
**Dr. S.K. Patil**
**Mr. K.V. Kulkarni**

Editorial Board

| | | |
|---|---|---|
| Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]<br>Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]<br>Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]<br>Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]<br>Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S] | guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam<br>Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]<br>Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]<br>Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]<br>Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S] | Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]<br>Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]<br>Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]<br>Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]<br>Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G] |

Published by- Dr. R. V. Bhole

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

CamScanner

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारत में जैविक कृषि<br>**Dr. Kapil Panchabhai Ghosiya** | 1-4 |
| 2 | 'एकबेतवा – एकमीरा – एकउर्वशी'('बेतवाबहतीरही'उपन्यासकेसंदर्भमें)<br>**डॉ.मृणाल शिवाजीराव गोरे** | 5-7 |
| 3 | दलित साहित्य के प्रेरणास्त्रोत: डॉ.बाबासाहब आंबेडकर<br>**श्री. किसन भानुदास वाघमोडे** | 8-11 |
| 4 | कोविड -१९चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>**प्रा. प्रताप बाबुराव शिंद, डॉ. लहू सिताराम वावरे** | 12-15 |
| 5 | कंत्राटी/करार शेती<br>**प्रा. गणेश गंभीरराव देशमुख** | 16-19 |
| 6 | शेतमजुरांपुढील आव्हाने<br>**डॉ. उमेश चिंधु भोकसे** | 20-23 |
| 7 | कृषी किंमत धोरण<br>**प्रा. अमित धर्मा पोवार** | 24-29 |
| 8 | WTO चे कृषी संबंधित करार व त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम<br>**डॉ.आर.एस. वानखेडे, डॉ.अरविंद अमृत बडगुजर** | 30-32 |
| 9 | करार शेती: एक अध्ययन<br>**राहुल मोरेश्वर लभाने** | 33-36 |
| 10 | शाश्वत शेती काळाची गरज<br>**कु. ए. एस. बनसोडे** | 37-40 |
| 11 | कृषी क्षेत्रातील कामगारांसमोरील आव्हाने<br>**प्रा. जयश्री मच्छिंद्र बगाटे** | 41-44 |
| 12 | भारतीय शेतीची बदलती पीक रचना<br>**कु. सुप्रिया रविंद्र नाळे** | 45-47 |
| 13 | अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे<br>**डॉ. एस. पी. उगले, कुशारे संगिता सुदाम** | 48-52 |
| 14 | भारतीय कृषी अर्थव्यवस्थेवरील कोव्हीड - १९च्या परिणामाचे विश्लेषण<br>**डॉ. सुभाष तातेराव पंडित** | 53-56 |
| 15 | भारतीय शेती क्षेत्रामध्ये सहकाराचे योगदान<br>**प्रा.डॉ. जगन्नाथ मोतीराम साळवे** | 57-59 |
| 16 | सहकारी शेती एक वास्तव<br>**के. एस. तिडके** | 60-63 |




CamScanner

| | | |
|---|---|---|
| 17 | कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल<br>डॉ. विशाल भाऊसाहेब पावसे , वैशाली दिनकर कानवडे | 64-67 |
| 18 | जल व्यवस्थापन : काळाची गरज<br>प्रा. के. एस. चव्हाण | 68-72 |
| 19 | कृषी उत्पादन वाढीतील किमान आधारभूत किंमतीची भूमिका- विशेष संदर्भ: सन 2016-17 ते 2020-21<br>डिके विनोद रमेश | 73-79 |
| 20 | रेशीम उद्योग समृध्दीचा मार्ग<br>डॉ.भाऊसाहेब पोपटराव दरेकर | 80-83 |
| 21 | आळंदीतील पर्यटकांचा धार्मिक वस्तूंच्या दुकानांवरील आर्थिक परिणामाचा अभ्यास<br>दादासाहेब मारकड डॉ. ओमप्रकाष मुंदे | 84-90 |
| 22 | कडधान्यांचे मानवी आहारातील महत्व<br>कु. पवार प्रिती आनंदराव डॉ. एल. जी. रेटवडे | 91-93 |
| 23 | जायकवाडी प्रकल्प एक दृष्टीक्षेप<br>डॉ.सत्यम काकासाहेब सानप | 94-97 |
| 24 | कोविड-19 साथीच्या रोगाचे भारतीय शेतीवरील परिणाम.<br>सहा. प्रा. दिपाली अतुल पडोळे | 98-100 |
| 25 | पुणे शहरातील शेतकरीआठवडेबाजारएकनाविन्यपूर्णथेटपणनप्रतिमान<br>रामदास गादगे | 101-106 |
| 26 | कोविड–१९ का कृषि क्षेत्र पर प्रभाव<br>डॉ० लक्ष्मी शंकर यादव | 107-109 |
| 27 | पौराणिक चेतना की समकालीन अभिव्यक्ति : सैरंध्री<br>डॉ. रमेश माणिकराव शिंदे | 110-113 |
| 28 | जल व्यवस्थापन ( ऐतिहासिक चित्र और गुजरात के जीवन कि डोर सरदार सरोवर)<br>डॉ. चंद्रिका आर. उकाणी | 114-116 |
| 29 | सहकारी शेती<br>शेख अलिम बाबूलाल, प्रा. तटाळे पदमाकर बळीराम | 117-119 |


CamScanner

# सहकारी शेती एक वास्तव

**के. एस. तिडके**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग मविप्र समाजाचे, कर्मवीर काकासाहेब वाघ कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,पिंपळगांव (बसवंत)
ई मेल : tidakekiran@gmail.com

**प्रस्तावना**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा20 टक्के पर्यंत कमी झाला असला तरीही शेतीचे महत्त्व कमी झालेले दिसून येत नाही. भारतातील वेगवेगळ्या घटक राज्यांमध्ये जी शेती केली जाते तिला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. सहकारी शेती देखील अशाच प्रकारची एक शेती पद्धती असून ज्या पद्धतीत शेतीची सर्वच्या सर्व किंवा काही कामे ही अनेक शेतकरी एकत्र येऊन स्वच्छेने सहकारी पद्धतीने करतात. तसेच प्रत्येक शेतकऱ्याचा आपल्या शेतीवरचा हक्क कायम असतो. पण लागवडीच्या कामासाठी एकच परिमाण म्हणून अनेक शेतकऱ्यांची जमीन एकत्र जोडली जाते. सहकारी शेतीचे अधिक चांगले असे संयुक्त शेती, सामूहिक शेती इत्यादी प्रकार आहेत. मोठ्या प्रमाणावर लागवड करण्याचे कित्येक फायदे या सहकारी शेती पद्धती मध्ये मिळतात. जमीन कसणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी स्व इच्छेने आपल्या जमिनीचा मालकी हक्क अबाधित ठेवून ती लागवडीसाठी एकत्र करणे, सामान्यता हे छोटे शेतकरी असून त्यांच्याकडची साधन सामग्री तुटपुंजी असते. शेतीबरोबरच ते आपली साधनसामग्री एकत्रित करतात आणि सहकारी शेती संस्थेची स्थापना करून कृषीविषयक सर्व कार्ये ते सामूहिकपणे पार पाडतात. शेतकऱ्या बरोबरच त्याच्या कुटुंबातील व्यक्ती देखील शेतीत काम करतात. त्या कामाचा मोबदला त्यांना मिळतो. शिवाय खर्च वजा जाता उर्वरित नफ्याचे किंवा वाढाव्याचे वाटप देखील शेतकरी सभासदांमध्ये केले जाते. अल्पभूधारक शेतकऱ्यां बरोबरच भूमिहीन शेतमजूर व ग्रामीण बेरोजगार व्यक्तींना देखील ही जमीन कसण्यासाठी दिली जाते. "एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक" या सहकाराच्या मूल मंत्रा नुसार अनेक सभासद एकत्र येऊन त्यांची संघशक्ती वाढते. संस्थेची पत वाढल्यामुळे बँकेमार्फत कर्ज, सुधारित बी-बियाणे, रासायनिक तंत्र व यंत्रसामग्री उपलब्ध होते. पाणीपुरवठ्याच्या योजना राबविल्या जातात. त्याचबरोबर परस्पर सहकार्य, प्रेम, बंधुत्व, सहकार्याची वृत्ती यासारखे सामाजिक मूल्य देखील जोपासण्यास मदत होत असते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सहकारी शेती म्हणजे काय ? सहकारी शेतीचे प्रकार आणि भारताच्या विकासात सहकारी शेतीचे असलेले योगदान अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन समस्या विधान**

सहकारी शेती पद्धतीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१.सहकारी शेतीची संकल्पना स्पष्ट करणे.
२.भारतातील सहकारी शेतीच्या प्रकारांचा अभ्यास करणे.
३.भारताच्या आर्थिक विकासातील सहकारी शेतीचे योगदान अभ्यासणे.
४.जागतिक पातळीवरील सहकारी शेतीचे योगदान अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये माहितीचे संकलन करण्यासाठी माहितीच्या दुय्यम स्रोतांचा वापर केलेला आहे. त्यासाठी विविध मासिके, संदर्भ पुस्तके आणि सांकेतिक स्थळे इत्यादींचा आधार घेतलेला आहे.

**संशोधन विश्लेषण**

भारतासारख्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थे सहकारी शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. देशाच्या आर्थिक विकासात सहकारी शेती आपापल्या परीने भर टाकताना दिसून येते.विकासातील सहकारी शेतीच्या कामाची दखल घेऊन भारतात 1946 मध्ये सहकारी नियोजन समिती नेमली गेली होती. या समितीने भारतातील सहकारी शेती पद्धतीचा अभ्यास करून सहकारी शेती पद्धतीचे खालील चार प्रकार सांगितलेले होते.

**१.कुळ सहकारी शेती संस्था**

ज्यांच्याजवळ स्वतःच्या मालकीची जमीन नाही, परंतु ज्यांना जमीन कसण्याची खूप इच्छा आहे, अशा भूमिहीन शेतमजुरांना स्थापन केलेली संस्था म्हणजेच सहकारी शेती संस्था होय. या संस्था सरकारकडून किंवा जमीनदारा कडून दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने जमीन मिळवितात. या जमिनीचे लहान लहान तुकडे करून संस्था प्रत्येक सभासदाला जमिनीचा तुकडा म्हणून भाडेपट्ट्याने देते. संस्था शेतीच्या विकासाची योजना तयार करते. त्याचबरोबरीने त्यात कोणते

पीक घ्यावे ? कोणते बियाणे वापरावे ? कशाची लागवड करावी ? कोणती खते किती व केव्हा द्यावीत ? औषध फवारणी, कापणी, मळणी इत्यादी बाबींचा या नियोजनामध्ये समावेश होतो. शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा शेतकरी मालक असल्याने त्याला आपल्या इच्छेप्रमाणे या उत्पादनाची विल्हेवाट लावता येते. संस्थेला नफा झाल्यास त्याचा काही हिस्सा राखीव निधीत वर्ग करून उर्वरित रक्कम सभासदांमध्ये खंडाच्या प्रमाणात लाभांश रूपाने वाटली जाते. भूमिहीन व बेरोजगार आपले वैयक्तिक कौशल्य दाखवून जास्त नफा मिळवू शकतात.

**२. सामूहिक सहकारी शेती सोसायटी**

सरकारकडून किंवा जमीनदार व्यक्तींकडून भाडेपट्ट्याने मिळालेली जमीन असते. तिची मालकी सामुदायिक असते. अशा शेत जमिनीचे लहान लहान तुकड्यांमध्ये विभाजन केले जाते व शेतकऱ्यांची सामुदायिक शेती सोसायटी स्थापन केली जाते. जमिनीची देखभाल व लागवड संस्थेमार्फत केली जाते व शेतकऱ्याचा जमिनीवरील वैयक्तिक हक्क संपुष्टात येतो. सभासदांना संस्थेच्या जमिनीवर काम करावे लागते आणि त्याबद्दल त्यांना ठराविक दराने मजुरी दिली जाते. संस्था शेतीच्या विकासाच्या योजना तयार करते व सभासदांच्या सहकार्याने त्याची अंमलबजावणी करण्यात येते. आधुनिक पद्धतीने यंत्रसामग्रीचा मोठ्या प्रमाणावर वापर करून शेती केली जाते. संस्थेकडून शेतमालाची विक्री करण्यात येते. वर्षअखेरीस खर्च वजा जाता वाढाव्याचे किंवा नफ्याचे वाटप सभासदांमध्ये केले जाते.

**३. संयुक्त सहकारी शेती संस्था**

या शेती पद्धतीमध्ये अल्पभूधारक शेतकरी एकत्र येतात. संयुक्त मशागत करण्यासाठी त्यांची जमीन एकत्र करून अशा संस्थेची स्थापना केली जाते. संस्थेकडे जमीन हस्तांतरित केली तरी शेतकऱ्याचा आपल्या जमिनीवरील व्यक्तिगत मालकी हक्क कायम राहतो. संस्थेने शेतीच्या विकासासाठी केलेल्या योजनेनुसार सर्व सभासद एकत्रितपणे काम करतात. त्यांना लागवडीपासून काढणीपर्यंत ची सर्व कामे करावी लागतात. या कामाबद्दल त्यांना मजुरी दिली जाते. शेतीसाठी आवश्यक असलेले यंत्रे, खते, बी-बियाणे, अवजारे इत्यादी साहित्य सहकारी संस्था पुरवते. उत्पादित मालाची विक्री देखील संस्थेमार्फत होते. संस्थेचा खर्च वजा जाता उरलेला नफा मजुरीच्या प्रमाणात सभासदांमध्ये वाटला जातो. अशा प्रकारची संस्था ही प्रामुख्याने पीक योजनेचे नियोजन करणे, शेतीसाठी आवश्यक असलेल्या साधनांची खरेदी करणे, शेतजमिनीची सुरक्षितता, शेती सुधारण्यासाठी निधी उभारणे, शेतीसाठीची यांत्रिक साधने खरेदी करणे, प्रशासकीय खर्च भागवणे, शेतीमध्ये सुधारणा करणे आणि शेती विकासासाठी आवश्यक असलेले सर्व उपक्रम हाती घेण्याचे कार्य संयुक्त सहकारी शेती संस्था करत असते.

**४.सहकारी सुधारित शेती संस्था**

ही संस्था शेतीत सुधारणा करून शेती उत्पन्नात वाढ घडवून आणणे या उद्देशाने स्थापन केली जाते. या पद्धती शेतकरी व सभासद आपल्या जमिनी एकत्र करत नाही किंवा सामुहिकपणे लागवडही केली जात नाही. किमान दहा किंवा त्यापेक्षा जास्त सभासद एकत्र येऊन अशा सहकारी शेती संस्थेची सहकारी कायद्यानुसार नोंदणी करून घेतात. संस्थेमार्फत सर्व सभासदांना मान्य होईल अशी शेती उत्पादनाची व विकासाची योजना आखण्यात येते. संस्थेकडून बी-बियाणांचा वापर, पेरणी, खतांचा वापर, पाणीपुरवठ्याच्या योजना, यांत्रिक अवजारांचा वापर याविषयी मार्गदर्शन केले जाते. अशा संस्थांना शासनाने तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, इमारत, जमिनीची सुधारणा, महागडी यंत्रसामुग्री यासाठी दीर्घ मुदतीची कर्जे तर जनावरे व कमी किमतीची अवजारे खरेदी करण्यासाठी मध्यम मुदतीची कर्जे सभासदांना उपलब्ध करून द्यावेत अशी सूचना देखील दिलेली आहे.

**जागतिक स्तरावरील सहकारी शेती**

शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने जगभरातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी सहकारी शेतीच्या संकल्पनेला चालना दिलेली दिसून येते. काळाच्या ओघात सहकारी शेती क्षेत्रात देखील अनेक प्रयोग झाले. त्याचे अनेक चांगले वाईट परिणाम दिसून आले. वैयक्तिक पातळीवर परंतु सहकारी तत्त्वावर शेती करण्याचे प्रयोग पहिल्यांदा अमेरिका, मेक्सिको, जर्मनी यासारख्या देशांमध्ये केले गेले. इस्त्राईल, यु.एस.ए व पूर्वेकडील युरोपियन देशात जमिनी एकत्र करून तिची मालकी सोसायटीकडे दिली गेली आणि संयुक्तपणे शेती विकसित करण्यासाठी प्रयत्न केले गेले. संस्थेचे सर्व सभासद समान पातळीवर असून प्रत्येक जण आपल्या कुवतीप्रमाणे किंवा गरजेनुसार योगदान देतो. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी असो किंवा संस्थेला सेवा पुरवण्यासाठी असो, सर्वांना बरोबरीच्या नात्याने वागविले जाते. विशिष्ट मालाची टंचाई निर्माण झाल्यास अशा कठीण प्रसंगात सर्वजण सहभागी होतात. पोलंडची शेती विकसित होण्यामध्ये सहकारी शेतीचा सिंहाचा वाटा असल्याचे दिसून येते. लहान आकाराच्या शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने सहकारी शेतीचा खूपच फायदा झालेला आहे. तसेच सहकारी शेतीच्या क्षेत्रात चीन सारख्या देशांनी देखील उल्लेखनीय प्रगती केल्याचे दिसून येते. कॅनडामध्ये 1945 नंतर सहकारी शेती संस्थांचे संघटन केले गेले. सोसायट्यांच्या बहुसंख्य सभासदांना शेतीचा पुरेसा



CamScanner

अनुभव असल्याने व सभासदांची निवड अतिशय काटेकोरपणे केली जात असल्याने त्यांनी चांगली प्रगती केली. परंतु सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रात केवळ एक टक्का एवढी जमीन लागवडीखाली होती.

**भारतातील सहकारी शेती**

भारत हा कृषिप्रधान देश असून शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी अजूनही जवळ-जवळ 68टक्के जनसंख्या खेड्यात राहते आणि शेतीवर आपला उदरनिर्वाह करते. राष्ट्रीय उत्पन्नातही शेतीचा वाटा सध्या 20 टक्के एवढा आहे. भारतातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचा आकार लहान असून त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. शेतजमिनीच्या आकारात वाढ करण्यासाठी जे अनेक उपाय सुचविण्यात आलेले आहे, त्यात सहकारी शेती हा उपाय अग्रभागी आहे. अगदी प्राचीन काळापासूनच शेतीक्षेत्रात एकत्रित काम करण्याचेसहकाराचे तत्त्व वापरले जात असे. एकमेकांना बी-बियाणे, अवजारे, बैलजोड्या पुरवणे, एकमेकांच्या शेतात श्रम करणे या गोष्टी भारतामध्ये नवीन नाही. सहकार नियोजन समितीने शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शेती करण्याच्या प्रकारावर भर देण्याची आवश्यकता मांडली. आणि त्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर देशाच्या सर्व भागांमध्ये सहकारी शेतीचा प्रारंभ करावा अशी सूचना मांडली. भारत सरकारने 1940 मध्ये सहकारी शेतीचा अभ्यास करण्यासाठी पॅलेस्टाईनला शिष्टमंडळ पाठविले होते. सदरच्या शिष्टमंडळाने सहकारी शेतीचे व्यापक असे प्रयोग भारतातील सर्व प्रदेशात करावेत व केवळ शेतमालाचे उत्पादनच नव्हे तर विपणन व सामाजिक आर्थिक स्वरूपाचे उपक्रम देखील सुरू करावी अशी महत्त्वाची शिफारस या समितीने केली होती.1950 - 51 च्या अखेरीस मोठ्या प्रमाणावर सहकारी शेती सोसायट्या स्थापन झाल्या. राजस्थान, ओरिसा, पंजाब या राज्यांत पाकिस्तानातून विस्थापित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी सहकारी शेती संस्था स्थापन केल्या गेल्या. अधिक धान्य पिकवा या योजनेत समाविष्ट होणाऱ्यांना जमिनीचे अग्रक्रमाने वाटप करण्याच्या सरकारच्या धोरणानुसार काही संस्था प्रवर्तित केल्या गेल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या सहकारी शेती सोसायट्या स्थापन झाल्या त्यापैकी बहुसंख्य संस्था फारशी प्रगती करू शकले नाही. सोसायटी कडील जमिनीचा निकृष्ट दर्जा, दीर्घ मुदतीच्या कर्जाचा अपुरापुरवठा, पाणी पुरवठ्याचा हा अभाव, सभासदां मधील भेदाभेद, गैर व्यवस्थापन यासारख्या कारणांमुळे त्यांना अपयश आले.

**नियोजन काळातील सहकारी शेती**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक विकासाला गती देण्यासाठी पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती देण्यासाठी सहकारी शेतीवर भर देण्यात आला. मध्यम व लहान शेतकऱ्यांना स्वच्छेने एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे प्रस्तावित करण्यात आले. राज्य सरकारांनी सहकारी संस्थांच्या विकासासाठी योग्य असा आराखडा तयार करावा, अशी विनंती नियोजन मंडळामार्फत करण्यात आली.1959 मध्ये भारत सरकारने अस्तित्वात असलेल्या सहकारी शेती सोसायटी यांचा अभ्यास करण्यासाठी व त्यांचे कामकाज अधिक परिणामकारक व्हावे याबाबत सूचना करण्यासाठी एका कार्यगटाची स्थापना केली. लहान व मध्यम शेतकऱ्यांना आपली आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी सहकारी शेती हा एक चांगला उपाय आहे, असा निष्कर्ष काढला गेला. कोणत्याही प्रकारची सक्ती न करता स्वच्छेने शेतकरी चळवळीमध्ये सहभागी व्हावे, अशी सूचना करून कार्यरत असलेल्या सोसायट्यां पैकी बहुसंख्य सोसायटी सहकार तत्त्वांची पायमल्ली करीत असल्याने व सर्वकष असे याबाबत शासकीय धोरण नसल्याने सहकारी शेतीचे पुरेसे फायदे पाहिजे होत नाही. देशाच्या शेती विकासामध्ये सहकारी शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण असून त्याचबरोबर सहकार आणि पतपुरवठा, ग्रामीण उद्योग, व्यवसाय वृद्धी व जमीन सुधारणा या गोष्टींची सांगड घालण्याचे प्रयत्न तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये केले गेले. शेतीचे यांत्रिकीकरण झाल्यास बेरोजगारी वाढेल, पशुधन व मानवी शक्तीची उपेक्षा होईल, व्यक्तिगत प्रेरणाव लाभ राहणार नाही, दुय्यम दर्जाची वागणूक मिळेल या समजुतीमुळे व सहकारी शेतीला पोषक वातावरण नसल्याने भारतात सहकारी शेतीचे प्रयोग नंतरच्या काळात फारसे यशस्वी झालेले नाहीत.

**सारांश**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात देशाच्या आर्थिक विकासात सहकारी शेती क्षेत्राने मोलाचा वाटा उचलला आहे.कॉंग्रेसच्या १९५९ च्या नागपूर अधिवेशनात संयुक्त सहकारी शेती पद्धतीचा पुरस्कार करण्यात आला होता. नंतरच्या काळात ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देऊन विकास प्रक्रियेत शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागाचे देखील योगदान त्यामुळे वाढले गेले.परंतु अलीकडील काळात सहकारी शेती सोसायटी यांच्या संख्येत भरीव वाढ होऊनही त्यातील बहुसंख्य सोसायट्या या निद्रित अवस्थेत असल्याचे दिसून येते. नंतरच्या काळात सहकारी शेती सोसायट्यांच्या संख्येत वाढ झालेली असली तरी बहुसंख्य सोसायट्या या आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ शकल्या नाही. भारतातील बहुसंख्य शेतकरी निरक्षर आणि रुढीप्रिय असल्याने सहकारी शेतीचे फायदे त्यांच्या लक्षात आलेले नाहीत. शेतीचे यांत्रिकीकरण झाल्यास बेरोजगारी वाढेल, पशुधन व मानवी शक्तीची उपेक्षा होईल, व्यक्तिगत प्रेरणा मिळणार नाही, दुय्यम दर्जाची वागणूक



CamScanner

मिळेल या समजुतीमुळे व सहकारी शेतीला पोषक नसल्याने भारतात सहकारी शेतीचे प्रयोग नंतरच्या काळात फारसे यशस्वी झालेले नाही.असे असले तरीही सहकारी शेतीचे अनेक फायदे असून जगातील बहुसंख्य देशात वैयक्तिक शेतीचा प्रकार मोठ्या प्रमाणावर आढळतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकारी शेतीमुळे मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ मिळून लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यास मदत झाली आहे.

**संदर्भ**

१. कृषी अर्थशास्त्र, प्रा.डॉ.विजय कविमंडन, श्री मंगेश प्रकाशन (नागपूर)
२. कृषी भूगोल, डॉ.विजया साळुंखे, डायमंड पब्लिकेशन(पुणे)
३. भारतीय अर्थव्यवस्था - १, डॉ.एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन (जळगांव)
४. कृषी भूगोल, प्रा. एस.व्ही. ढाके, व्ही.जे.पाटील, एस.एन.भारंबे, प्रशांत पब्लिकेशन (जळगांव)
५. कृषी अर्थशास्त्र, डॉ. नीता वाणी, प्रशांत पब्लिकेशन (जळगांव)
६. विकिपीडिया
७. www.Google.com